# भारतीय जनता पक्ष

केंद्रीय कार्यालय
11, अशोक रोड. नवी दिल्ली-110001
फोन नं- 23005700, फॅक्सः 23005787

दि.8 जानेवारी, 2014

## भाजपाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या श्री निर्मला सीतारमन यांचे प्रेस वक्तव्य

–

बांगलादेश मध्ये हिंदू अल्पसंख्याकांवर होणा-या अत्याचाराबद्दल भाजप गंभीर आहे. बांग्लादेशमधील अंतर्गत सुरक्षा ही त्यांची अंतर्गत बाब आहे. निवडणुकीनंतर झालेल्या दंगलीत कोणाचा हात आहे हे अजून समजणे बाकी आहे. पद्धतशीर पणे हा हल्ला केला जात आहे. अनेक हल्ले हे हिंदू अल्पसंख्याक असलेल्या गावांमध्ये अर्थात उत्तरेकडील जिल्ह्यातील ठाकुरगाव, दक्षिणेकडील जिल्ह्यातील चीत्तागॉंग आणि पश्चिमेकडील जेसोर येथे केले जात आहेत. बांग्लादेशी मिडीया मधून असे वृत्त येत आहे की, या चार जिल्ह्यांत हिंदू लोकांवर घृणास्पद रित्या हल्ले होत आहेत. असेही सांगितले जात आहे की निवडणूकीनंतर अल्पसंख्याक हिंदूंची शंभर घरे जाळली आणि लूटली गेली.

त्याचप्रमाणे, पाकिस्तान हिंदू कौन्सिल सतत याविरोधात आवाज उठवत आहे, की इथे सातत्याने हिंदू मुलींना प्रताडीत केले जात आहे तसेच त्यांच्यावर बलात्कार केले जात आहेत, आणि त्यांनी आपला धर्म बदलण्यासाठी त्यांच्यावर जबरदस्ती केली जात आहे.  पाकिस्तानमधील डॉन डॉट कॉम ने म्हटलय की हिंदू मंदिरांवर हल्ले केले जात आहेत. 2012 मध्ये 3000 हिंदूंनी भारतात पलायन केले. आयरीन- संयुक्त राष्ट्रसंघाच्या हिंदू मानवाधिकार कमिटीच्या न्यूज सर्वीस ने आपल्या अहवालात म्हटलय की, मुस्लीम धर्म स्वीकारण्यासाठी हिंदू मुलींना बळजबरी केली जात आहे आणि त्यांच्यावर बलात्कार केले जात आहेत. तर भारतीय मिडीयाने हा मुद्दा अधोरेखित केला आहे की, या घटना वाढतच असून कराची येथे एकाच महिन्यात 15 -20 घटना घडल्या आहेत. आशिया मानवाधिकार आयोगाने (AHRC) ने सुद्धा असेच म्हटले आहे. आपल्या शेजारील देशात अस्थिरता आहे, मग तो बांग्लादेश असो किंवा पाकिस्तान, अल्पसंख्याक हिंदूंना लक्ष केले जात आहे आणि त्यांना प्रताडीत केले जात आहे. विदेश मंत्रालयाने हा मुद्दा अत्यंत काळजीपूर्वक आणि कुशलतेने हाताळला पाहिजे.

(**श्री अरुण कुमार जैन**)
मानद सचीव